## 📢 सार्वजनिक आवाहन (Call for Proposal)

### विषय: कृषी विभागाच्या नव्या "बोधचिन्ह (LOGO)" व "घोषवाक्य (Tagline)" साठी जनतेकडून प्रस्ताव मागविणे

---

कृषी विभाग, महाराष्ट्र शासन हे राज्यातील शेतीविषयक धोरणे, कृषी सेवा व शेतकरी कल्याण यासाठी कार्यरत असून, कृषी विभागाच्या कार्याचा दृश्यमाध्यमातील ओळखीचा (Visual Identity) एक भाग म्हणून नव्या "बोधचिन्ह (LOGO)" व "घोषवाक्य (Tagline)" ची निवड करण्याचे प्रस्तावित आहे.

या अनुषंगाने राज्यभरातून रचनात्मक, नावीन्यपूर्ण आणि कलात्मक कल्पनांची एक मुक्त स्पर्धा आयोजित करण्यात येऊन सर्व नागरिक, विद्यार्थी, डिझायनर, कलावंत, लेखक, शेतकरी, उद्योजक, जाहिरात व्यावसायिक यांच्यामार्फत "बोधचिन्ह (LOGO)" डिझाईन व "घोषवाक्य (Tagline)" मागविण्यात येत आहे. निवडलेला लोगो विभागाच्या सर्व सरकारी पत्रव्यवहारात, प्रसिद्धी माध्यमांमध्ये, वेबसाइटवर व विविध प्रचार साहित्यामध्ये वापरण्यात येणार आहे.

---

### ✏️ प्रस्तावासाठी अपेक्षित बाबी:

**१. बोधचिन्ह (Logo):**

- लोगो कृषी विभागाच्या कार्यपद्धती, मूल्य, धोरणे आणि मिशनचे प्रभावी प्रतीनिधित्व करणारा असावा. यामध्ये शाश्वत व पर्यावरणपूरक शेती, शेतकरी सक्षमीकरण व कल्याण, पारंपरिक मूल्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश, कृषी क्षेत्रातील नवप्रवर्तन व संशोधन, महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीचा गौरव
- विभागाच्या उद्दिष्टे, मूल्ये आणि शेतकऱ्यांच्या हिताशी सुसंगत असावा.
- रंग, रूपरेषा व अक्षरांचे योग्य संतुलन असलेला असावा.
- डिजिटल व मुद्रण माध्यमांसाठी योग्य (scalable, high-resolution) असावा.
- मौलिक व स्वतः तयार केलेला असावा (कॉपीराइट उल्लंघन नसावा).
- फाईल फॉरमॅट: JPEG / PNG (३०० dpi) आणि व्हेक्टर फॉरमॅट (AI / SVG / PDF)
- बोधचिन्हात आकार व रंग यांची सुसंगती असावी. बोधचिन्हात वापरलेले रंग अर्थपूर्ण असावेत.
- आकार: A४ किंवा त्याहून मोठ्या आकारात स्केलेबल
- तपशील लेखन: संकल्पनेचे वर्णन करणारा संक्षिप्त परिचय अनिवार्य आहे.

**२. घोषवाक्य (Tagline):**

- मराठी भाषेत असावे.
- प्रेरणादायी, लक्षवेधी व विभागाच्या कार्याशी समर्पक असावे.
- अन्य कोणत्याही खाजगी/ शासकीय/ निमशासकीय विभागातील संस्था/कार्यालय यांच्या घोषवाक्याची नक्कल नसावी.
- तपशील लेखन: संकल्पनेचे वर्णन करणारा १०० शब्दांचा संक्षिप्त परिचय अनिवार्य आहे.

---

### ✅ पात्रता

- सर्व भारतीय नागरिकांना खुली
- वैयक्तिक/ नोंदणीकृत गट/ शैक्षणिक संस्था यांना सहभाग घेता येईल
- प्रवेश शुल्क नाही
- एक स्पर्धक प्रत्येक घटकासाठी जास्तीत जास्त दोन प्रस्ताव सादर करू शकतो.
- "बोधचिन्ह (LOGO)" व "घोषवाक्य (Tagline)" साठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करावे. एकच स्पर्धक दोन्ही घटकासाठी प्रस्ताव सादर करू शकतो.

## 🏆 बक्षीस स्वरूप:

| स्पर्धा प्रकार | बक्षीस स्वरूप | रक्कम (₹) |
|---|---|---|
| बोधचिन्ह | 🥇 प्रथम पारितोषिक | ₹ १,००,००० |
| | 🏅 प्रथम क्रमांक वगळून गुणानुक्रमे पहिले ०२ विजेते | ₹ १०,००० प्रत्येकी |
| घोषवाक्य | 🥇 प्रथम पारितोषिक | ₹ ५०,००० |
| | 🏅 प्रथम क्रमांक वगळून गुणानुक्रमे पहिले ०२ विजेते | ₹ ५,००० प्रत्येकी |

सर्व विजेत्यांना प्रमाणपत्र व कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन/प्रत्यक्ष कार्यक्रमात सन्मान दिला जाईल.

---

## 📬 प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख:

📅 दिनांक: २५/०६/२०२५ पर्यंत

---

## 📧 प्रस्ताव सादरीकरणाचे माध्यम:

- केवळ Online - Email: krushipublicity@gmail.com

---

## 📎 आवश्यक संलग्न माहिती:

- स्पर्धकाचे संपूर्ण नाव, पत्ता, ईमेल, मोबाईल क्रमांक
- स्वघोषणा पत्र की, सादर केलेला बोधचिन्ह /घोषवाक्य हे स्वतःच्या बौद्धिक संपदेतून तयार केले आहे.
- बँक तपशील (फक्त विजेत्यांसाठी मागवले जातील)

---

## ⚖️ अटी व शर्ती:

- बोधचिन्ह व घोषवाक्य शिफारस निवड अंतिमतः मूल्यांकन समितीच्या निर्णयानुसार होईल.
- निवड झालेले बोधचिन्ह व घोषवाक्य कृषी विभागाची मालमत्ता ठरेल.त्या संबंधीचे सर्व हक्क कृषी विभागाकडे राहतील.
- कृषी विभागाला कोणताही प्रस्ताव नाकारण्याचा किंवा कोणत्याही टप्प्यावर स्पर्धा रद्द करण्याचा अधिकार असेल.
- बोधचिन्ह व घोषवाक्य यामध्ये आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार विभागाकडे राखीव आहे.
- आवश्यकता भासल्यास, मूल्यांकन समितीच्या निर्णयानुसार “बोधचिन्ह (LOGO)” व “घोषवाक्य (Tagline)” निवडीसाठी थोडे सुधारित आवृत्ती मागविल्यास, त्यानुसार पुर्तता करुन देणे संबंधित सादरकर्त्यास बंधनकारक असेल.
- लोगो पूर्णतः मौलिक असावा. कोणतेही कॉपीराईट उल्लंघन झाल्यास स्पर्धक अपात्र ठरवण्यात येईल.
- “बोधचिन्ह (LOGO)” व “घोषवाक्य (Tagline)” अंतिम मान्यतेबाबत निर्णय शासनस्तरावर राहील.
- स्पर्धकाने लोगो सादर केल्यास वरील सर्व अटी स्वीकारल्या आहेत असे गृहित धरले जाईल.

---

## ➡️ संपर्क

अधिक माहिती व शंका निवारणासाठी संपर्क करा:

📧 **ईमेल:** [krushipublicity@gmail.com]

📞 **फोन:** [०२०-२५५३७८६५]

🌐 **संकेतस्थळ:** [www.krishi.maharashtra.gov.in ]

---

🖊️ राज्याच्या कृषी विकासाच्या दृष्टीने आपल्या कलात्मक योगदानाचे स्वागत आहे!